आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अ‍ॅप!
अ‍ॅप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

पान २
पडसाद : बदली प्रक्रियेचा असाही मापदंड
पान ८
बकरी ईद निमित्ताने उद्या वाहतूक मार्गात बदल
परिमंडळ दोन हद्दीत कोम्बिंग
शेवटचे पान
अयोध्येतील मंदिरात राम दरबाराचा अभिषेक
राफेलची निर्मिती आता भारतात

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २६९ । शुक्रवार, दि. ६ जून २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### मरण स्वस्त होत आहे..

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या आयपीएल विजेता संघाच्या विजयोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेने संवेदनशील माणसांना कविवर्य बाबूराव बागुल यांच्या 'मरण स्वस्त होत आहे' या ओळींची आठवण झाली असेल. कोणत्याही घटनेत किडामुंगीसारखी माणसे मरतात आणि त्याचे कोणालाच काहीच वाटत नाही. या दुर्दैवी मुद्यावर पुन्हा एकदा राजकारण सुरु झाले आहे. राजकारण करण्यासारखे ढीगभर विषय आजूबाजूला असतांना माणसांच्या मरणावर राजकारण करण्याइतके निर्ढावलेपण हेच सध्याच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य बनत चालले आहे. कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीतील मृत्यूचा अस्थानी उल्लेख ते दर्शवतो. अशा घटनांना मिळून साऱ्यांचा निष्काळजीपणाच कारण असतो. पण ज्यांच्यावर वेळ येते ते ती झटकतात आणि इतरांवर ढकलतात. निगरगट्टपणाचे वर्णन करतांना 'गेंड्याची कातडी' अशा शब्दप्रयोग केला जात. त्याचा यापेक्षा वेगळा अर्थ काय असू शकेल? बाहेर माणसे चेंगरली होती पण तरीही स्टेडियममध्ये उत्सव सुरूच होता. याला काय म्हणावे? स्वतःच्या आनंदापुढे कोणालाही काहीच दिसू नये का? विजयोत्सव इतक्या तातडीने साजरा करण्यामागे काय हेतू असू शकेल. इतक्या तातडीने हा समारंभ करण्याची आवश्यकता नव्हती. समाजात आयपीएलचे गारुड कायम असताना असा कार्यक्रम घेऊ नये इतकाही विवेक दाखवला गेला नाही. कार्यक्रमाचे मोफत पास वाटण्याची आवश्यकता नव्हतीच. कारण भारतीय लोकांचे क्रिकेटप्रेम जगजाहीर आहे. पण ते प्रेम उन्मादात रूपांतरित होऊ शकते याची जाणीव आयोजकांना आणि सरकारलाही नसावी का? मध्ये काही दिवस जाऊ दिले असते तर विजयाची नशा कमी झाली असती का? या कार्यक्रमाला लाखो लोक जमतील याचा अंदाज यायलाच हवा होता. काही हजारांची क्षमता असलेल्या जागेत लाखोंनी माणसे कोंबली. या घटनेला आयोजक देखील तितकेच जबाबदार आहेत. बळी गेलेल्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत जाहीर केली म्हणजे सरकारची जबाबदारी संपत नाही. कुटुंबाने गमावलेल्या माणसाची जागा पैसे घेऊ शकतील का? या घटनेत काहींनी त्यांची तरुण मुले, काहींनी घरचा कर्ता गमावला असेल. कुटुंबातील आप्तांच्या मृत्यूचे दुःख त्या त्या कुटुंबासाठी न संपणारे असते. राजकीय पक्ष सामान्य माणसांना भावनांच्या हिंदोळ्यावर झुलवतात आणि माणसेही झुलतात. त्याची फिकीर कोणालाच वाटेनाशी झाली आहे. उलट लोकभावनांच्या झुलीवर स्वार्थी राजकारणाची पोळी भाजून घेण्याला मुत्सद्दीपणाचे लेबल लावले जाते. माणसे मृत्यूला जास्त घाबरतात असे मानले जाते. तथापि अशा कार्यक्रमांना माणसे ज्या संख्येने जमतात ते पाहाता माणसे मृत्यूला घाबरत नसावीत असा त्याचा अर्थ निघू शकेल. गर्दी बघून त्यांच्याही अंगावर काटा येत नाही. आपण कुठे जात आहोत? का जात आहोत? जिथे जाणार आहोत तिथला भवताल कसा आहे? दुर्घटना घडू शकते अशी पुसटशी शंका येऊ नये का? असे साधे प्रश्न देखील जिथे तिथे गर्दी करणाऱ्या माणसांना पडत नाहीत. २०-२० विश्वचषक जिंकल्यावर मुंबईत संघाची विजयी मिरवणूक काढण्यात आली होती. तेव्हाही अशीच लाखोंची गर्दी जमली होती. चेंगराचेंगरीच्या घटनांच्या भूतकाळातून माणसे काहीच शिकली नाहीत हेच खरे. माणसांचे मरण स्वस्त केले गेले आहे आणि माणसांनीही ते करून घेतले आहे. आता याही घटनेच्या चौकशीची मागणी सुरु झाली आहे. ती कदाचित केलीही जाईल. चूक कोणाची तेही कदाचित शोधले जाईल. पण पुढच्याला ठेच लागूनही मागच्यांना शहाणपण येणारच नसेल तर अशा चौकशा म्हणजे फक्त उपचारच ठरतील. नव्हे ठरतात.

# मनपात १०० प्लस

## भाजप पदाधिकारी मेळाव्यात भक्कम विजयाचा निर्धार

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिका निवडणुकीसाठी भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी १०० प्लसचा नारा दिला आहे. महापालिका निवडणुकांसाठी युती झाली तर ठीक, नाही तर स्वबळावर निवडणुका लढवण्याचा नारा महाजन यांनी दिला आहे. तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपला भक्कम विजय मिळवण्यासाठी बारकाईने आणि काटेकोर नियोजन करण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकारी मेळाव्यात भाजपच्या प्रदेश, राज्य आणि जिल्हा स्तरावरील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणुकीपूर्वी कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा भरण्याचे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी तयारीला लागण्याचे स्पष्ट संदेश या मेळाव्यातून देण्यात आला. यावेळी मंचावर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय निरीक्षक व भाजपचे राष्ट्रीय सरचिटणिस अरुण सिंह, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री जयकुमार रावल, संजय सावकारे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस रवी अनासपुरे आणि इतर पदाधिकारी होते.

यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवरांनी मोदी सरकारच्या यशस्वी अकरा वर्षांच्या कार्यकाळातील विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थानिक पातळीवर योजनाबद्ध कार्यक्रमाच्या आयोजनावर भर देण्याचे आवाहन केले.बूथ पातळीवर संघटनात्मक कामकाज अधिक मजबूत करण्यासाठी बुथचे व मंडलांचे नियोजन तसेच कार्यकर्त्यांची नियुक्ती, बूथ प्रमुखांची नेमणूक करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. दि.६ ते दि.७ तारखेपर्यंत मंडल स्तरावर त्यानंतर जिल्हास्तरावर दि.१० पर्यंत कार्यकारिणीची बैठक घेऊन त्यात याचा आढावा घेतला जाणार आहे. ही माहिती कागदावर अधोरेखित करून राज्याच्या माध्यमातून केंद्राकडे पाठवली जाणार आहे.

पक्षाच्या स्थापनेपासून नाशिक जिल्ह्यात भाजपने सातत्याने जनतेचा विश्वास मिळवला आहे. सुरुवातीच्या काळात उत्तमराव पाटील यांच्या नेतृत्वापासून भाजपची पायाभरणी झाली आणि आता जिल्ह्यात १,२२२ मंडळे उभारण्यात आली आहेत. या मजबूत संघटनेच्या आधारे नगरपालिका, महापालिका, नगरपंचायत अशा विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचा झेंडा फडकवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असल्याचे रवी अनासपुरे यांचे प्रास्ताविकातून सांगितले.

पान १० वर



### निष्ठावानांना न्याय

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत पक्षातील सच्चा, निष्ठावान आणि कार्यक्षम कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे आश्वासन दिले. नेत्यांच्या पुढेमागे फिरणाऱ्यांना तिकीट मिळणार नाही,असे स्पष्ट करुन जो आपल्या वॉर्डातून मते मिळवून देण्याची क्षमता ठेवतो.त्याच कार्यकर्त्याला संधी दिली जाईल.सत्तेत आपला पक्ष असल्याने प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी कोणताही चुकीचा व्यवहार अथवा वक्तव्य टाळावे. जबाबदारीने वागा आणि पक्षाच्या प्रतिमेची काळजी घ्या, असेही बावनकुळे म्हणाले. भाजपशी १ कोटी ५१ लाख लोक थेट जोडलेले आहेत. २०२४ मध्ये नेत्यांची निवड झाली असून, २०२५ मध्ये कार्यकर्त्यांची यादी अंतिम केली जाणार आहे, असेही स्पष्ट केले.



# आम्ही तिघे तीन शिफ्टचे चालक

**इगतपुरी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हस्ते आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या चौथ्या टप्प्याचे लोकार्पण झाले. लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस, एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ऑडी कारमधून महामार्गाची पाहणी केली. यावेळी स्वतः फडणवीस आणि शिंदे यांनी गाडी चालवली. तर अजित पवार तर खात्याचे सचिव मागच्या सीटवरील प्रवासी होते. दोघांनी नियमांचे पालन करून उत्तम गाडी चालवली. मी लक्ष ठेवून होतो, अशी मार्मिक प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. तर आम्ही तिघे तीन शिफ्टमध्ये महाराष्ट्राचे उत्तम सारथ्य करत असल्याचे फडणवीस म्हणाले.



इगतपुरी ते आमणे या अंतिम टप्प्याचे लोकार्पण झाल्याने नागपूर येथून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर आठ तासांत पोहोचता येणार आहे. समृद्धीनंतर आता शक्तिपीठ महामार्ग पूर्ण करण्याचा निर्धार फडणवीस यांनी यावेळी बोलून दाखवला. शक्तिपीठ महामार्गामुळे मराठवाड्याचे आर्थिक चित्र बदलेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

समृद्धी महामार्ग चौथ्या टप्प्याचे लोकार्पण (पान १० वर)

# कार्यकर्त्यांचे मनोमिलन

## शिवसेना व मनसे युतीसाठी पुढचे पाऊल



**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे एकत्र येण्याची चर्चा सुरू असतानाच नाशकात दोन्ही ठाकरेंच्या कार्यकर्त्यांचे मनोमिलनही झाल्याचे दिसून आले. नाशिकमध्ये मनसे कार्यालयाच्या उद्घाटनाला उद्धव ठाकरेंच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावल्याचे दिसून आले. शिवसेना ठाकरेंच्या जिल्हाप्रमुख डी. जी.सूर्यवंशींसह अनेक पदाधिकारी मनसे कार्यालयात उपस्थित राहिले. त्यामुळे डोंबिवलीनंतर आता नाशकातही दोन्ही ठाकरेंचे कार्यकर्ते मनाने एकत्र आले. कार्यकर्त्यंचे मनामिलन म्हणजे दोन्ही ठाकरे एकत्र येण्यासाठी आणखी एक पाऊल पुढे पडल्याची चर्चा सुरू झाली असून आता दोन्ही ठाकरेंचे मनोमिलन कधी होणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागून आहे.

पान १० वर

### अमित ठाकरे म्हणतात...

आता ज्युनियर ठाकरेही, युतीवर व्यक्त होऊ लागलेत. दोन दिवसांपूर्वी आदित्य ठाकरेंनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्यानंतर गुरुवारी राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरेंनीही, एकत्र येण्यावर काहीच हरकत नसल्याचे सूचक वक्तव्य केले. त्यांनी या आधी मनसेकडून दोनवेळा तसा प्रयत्न झाल्याची आठवण करून दिली. आता दोन्ही नेत्यांची इच्छा असेल तर फोन करावा असा सल्ला त्यांनी केली.

## कळवण अपघातातील मृतांवर अंत्यसंस्कार

**देवळा । प्रतिनिधी**

नाशिक येथून बुधवारी विवाह सोहळा आटोपून देवळा, नामपूरकडे निघालेल्या एकाच कुटुंबातील ५ जणांवर कळवणनजिक काळाने घाला घातला. या भीषण अपघातात देवळा येथील मेतकर परिसरातील तीन तर नामपूर येथील भदाण परिवारातील दोन जण तसेच वाहन चालक असे सहा जण ठार झाले.

मृतांवर काल देवळा व नामपूर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. देवळा व नामपूर शहरातील सर्व व्यापारी बांधवांनी आपली व्यावसायिक प्रतिष्ठान बंद ठेवून अपघातातील मृतांना श्रद्धांजली वाहिली.

(सविस्तर वृत्त आतील पानात)



◉ द्वारका ते हॉटेल जत्रा चौकापर्यंतच्या उड्डाणपुलावरील पावसाचे साचलेले पाणी बाहेर पडण्यासाठी लावण्यात आलेले पाईप तुटल्यामुळे कोसळणारे पाणी वाहनधारकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.या कोसळणाऱ्या पाण्यामुळे वाहनधारकांना समोरचे दिसत नसल्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# सरकारकडून १९७ कोटींची जलसंधारण कामे रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

निधीची अडचण, भूसंपादनाची समस्या, स्थानिक लोकांचा विरोध तसेच कंत्राटदारांच्या असहकार्यामुळे गेल्या सात वर्षांपासून रखडलेल्या आणि बंद पडलेली १९७ कोटी रुपये खर्चाची जलसंधारणाची कामे रद्द करण्यात आली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

फडणवीस यांनी अलीकडेच मृद आणि जलसंधारण विभागाच्या योजनांचा आढावा घेतला. त्यावेळी तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून जलसंधारण खात्याच्या अनेक योजना रखडल्या असल्याचे निदर्शनास आले. ही कामे ६ ऑक्टोबर २०१८ ते २० जानेवारी २०२२ या कालावधीतील असून, या ९०३ कामांची किंमत १९७ कोटी २० लाख रुपये इतकी आहे.

जलसंधारण योजनांची कामे सुरु न झाल्याने क्षेत्रीय स्तरावर या योजना प्रलंबित दिसत होत्या. अशा बंद आणि रखडलेल्या योजनांमुळे बांधिल दायित्वात वाढ दिसून येत होती. त्यामुळे विभागातील नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची व्याप्ती कमी होत होती.

पान १० वर

# बडगुजरांचा भाजप प्रवेशाचा मार्ग प्रशस्त

## प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले, पक्षाचे दरवाजे सर्वांसाठी खुले

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत, मात्र स्थानिक पातळीवरील वाद आणि आक्षेप लक्षात घेऊन गिरीश महाजन हे पुढील प्रक्रिया हाताळत असल्याचे सूचक वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. यामुळे शिवसेना (उबाठा गट) चे माजी उपनेते सुधाकर बडगुजर यांच्या पक्षातून हकालपट्टीनंतर त्यांचा भाजप प्रवेशाचा मार्ग प्रशस्त झाला आहे.





बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले, ज्याला पक्षात यायचे आहे, त्याच्यासाठी दरवाजे खुले आहेत. मात्र, नाशिकच्या आमदार सीमा हिरे यांनी त्यांच्या प्रवेशाला विरोध दर्शवला आहे. निवडणूक नुकतीच झाली असून, दोघेही एकमेकांविरोधात

पान १० वर

### ठाकरे एकत्र आले तरी फरक नाही

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चांबाबत विचारले असता, बावनकुळे यांनी स्पष्ट सांगितले, ही त्यांची पक्षांतर्गत बाब आहे. ते एकत्र येतात का नाही, यावर आमचा काही संबंध नाही. आमचे काम आणि आमची वाटचाल ठरलेली आहे. त्यांचे एकत्र येणे भाजपसाठी कोणतेही आव्हान नाही.

### निवडणुकांसाठी भाजप सज्ज

बावनकुळे यांनी सांगितले की, भाजपने आगामी निवडणुकांसाठी तयारी पूर्ण केली आहे. मोदी सरकारला ११ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर १५० दिवसांचा विशेष कार्यक्रम राबवला जाणार आहे. पुढील १५ दिवसांत आमचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा प्रचार करतील.

# दत्ता गायकवाड शिवसेनेचे उपनेते

**मुंबई/नाशिकरोड । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने बुधवारी रात्री उशिरा नव्या चार उपनेत्यांची नियुक्ती जाहीर केली. नाशिकचे दत्ता गायकवाड, जळगावचे गुलाबराव वाघ, रत्नागिरीचे माजी आमदार सुरेंद्र उर्फ बाळ माने आणि जालन्याचे सचिन घायाळ यांना उपनेतेपदावर संधी देण्यात आली आहे.

राज्यात दिवाळीच्या आसपास महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका अपेक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी पक्ष संघटना बांधणीवर भर दिला आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात नव्या उपनेत्यांच्या नियुक्तीची माहिती देण्यात आली आहे.



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपनेते सुधाकर बडगुजर यांची पक्षविरोधी वक्तव्य केल्यामुळे हकालपट्टी केली होती. त्यानंतर आता उद्धव ठाकरेंनी बडगुजर यांच्या जागी सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड यांची उपनेतेपदी निवड केली आहे.सुरुवातीला गायकवाड यांना मराठा महासंघ त्यानंतर शिवसेनेत प्रवेश, शहर संघटक पद मिळाले. त्यानंतर शिवसेनेबरोबर कायम एकनिष्ठ राहिल्यानंतर शहर संघटक पदापासून आतापर्यंत थेट शिवसेना उपनेतेपद दत्ता गायकवाड यांनी मिळवले असून, केवळ निष्ठेचे फळ म्हणूनच शिवसेनेने त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे.

सध्या नाशिक लोकसभा संपर्कप्रमुख व नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेचे अध्यक्षपद भूषविणारे दत्ता गायकवाड हे शिवसेनेशी गेल्या ३२ वर्षांपासून एकनिष्ठ राहिले आहे. १९९४ मध्ये शिवसेनेचे अधिवेशन होण्यापूर्वी त्यांनी मराठा महासंघाला

पान १० वर